# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग
प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड, अहमदनगर ..

**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक – २३ विषयाबाबतचे निर्णय.**

**मा.प्रशासक ठराव क्रं.७५** **विषय क्रमांक -७५**

दिनांक : २४/०९/२०२४ विभाग :लेखा विभागः

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका निधीतील विकास कामांची देयके क्रमवारीनुसार देणेबाबत..

---*---

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे वेतन,सेवानिवृत्ती वेतन,पाणी पुरवठा विज बिल,स्ट्रीट लाईट बिल पेट्रोल, वाहन दुरूस्ती कर्मचारी इ.देयके देण्यासाठी दरमहा सुमारे १४ कोटी रूपयांची आवश्यकता लागते. माहे जुलै २०२४ या महिन्याचे जी.एस.टी अनुदान सुमारे २ कोटी ७४ लाख रूपये कमी प्राप्त झाले त्यामुळे जुलै पेड इन ऑगस्ट २४ चे वेतनातील कपातीची सुमारे १ कोटी ३८ लाख रक्कम अदा करता आली नाही.

अत्यावश्यक असलेली देणी मधील स्ट्रीट व पाणी पुरवठा लाईट बीलाचे सुमारे ७ कोटी, शिक्षण विभाग वेतन हिस्सयाचे ३ महिन्याचे सुमारे ९० लाख, मानधन कर्मचारी ८ लाख, कोर्ट केसेस सुमारे ४० लाख, सेवानिवृत्ती वेतन धारक यांचे ६ वा वेतन आयोगाचा फरकाचा हप्ता रूपये ९ लाख या महिन्यात देणे बाकी आहे. याव्यतिरीक्त पुरवठादार, जेम वरिल पुरवठादार यांचीही देणी विहीत मुदतीत अदा करणे आवश्यक असल्याने त्यांचाही वारंवार पाठपुरवठा सुरू असतो.

विविध विकास कामांची देयके सन २००९ पासून थकीत आहेत. सदर देयके मिळणे साठी ठेकेदार वारंवार मागणी करित आहेत. तसेच विविध शासकीय योजनांचा मनपा हिस्सा भरणे बाकी असल्याने प्राप्त शासकीय निधी एवढीच रक्कम अदा केली जाते. मनपा फंडात पुरेशी शिल्लक रहात नसल्याने देयके अदा करता येत नाहीत. त्यामुळे ठेकेदार देयके मिळणे साठी विविध प्रकारे दबाव आणून प्रयत्न करतात. अशा परिस्थितीत काम करणे शक्य होत नाही व लोकांच्या रोषाला वारंवार सामोरे जावे लागते. त्याचबरोबर लोकांशी संवाद साधणे व त्यांचे समाधान करणे शक्य होत नाही. याशिवाय दैनंदिन संचिकांवर संवाद साधणे व त्यांचे समाधान करणे शक्य होत नाही. याशिवाय दैनंदिन संचिकांवर अभिप्राय देणे अभ्यासपूर्ण पणे प्रत्येक वेळी मुख्यलेखाधिकारी म्हणून शक्य होत नाही.

काही जुने ठेकेदार मनपाविरोधात देयके मिळविण्यासाठी मा. न्यायालयात जातात व मा.न्यायालय सुद्धा मनपाला देयके अदा करणे बाबत आदेशित करते.

अश्या परिस्थित देयके देण्याबाबत निश्चित धोरण आखणे व त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

या करिता मनपा निधीतील बांधिल व अत्यावश्यक देयके अदा करून उर्वरित शिल्लक रक्कमेतून विकास कामांची देयक जेष्ठता यादितील क्रमवारीनुसार मासिक रक्कम रू१०लाखापर्यंत देयक अदा करणे तसेच मोठया रक्कमेचे देयक असल्यास त्या रक्कमेच्या २०% इतकी रक्कम अदा करावी व सदर देयकाबाबत मा.आयुक्त अहमदनगर महानगरपालिका यांची मंजूरी घ्यावी याबाबत लेखा विभागाने कार्यवाही करणेस सभा मंजूरी देत आहे. तसेच क्रमवारीनुसार देयकांची यादी मनपाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे व त्यातील जेष्ठता क्रमानुसार किंवा इतर कोणतीही हरकत ठेकेदारांना असल्यास त्यांना हरकत नोंदविण्यासाठी विहीत कालावधी देवून लेखी स्वरूपात हरकत नोंदविण्याबाबत आवाहन करणे व त्यासाठी वृत्तपत्रामध्ये जाहिरात देवून याबाबींचा व्यापक स्वरूपात प्रसिद्धी देणेबाबत कार्यवाही करणेस प्रशासक सर्वसाधारण सभा मंजूरी देत आहे.

**निर्णयः-**

महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांक: एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
**(मेहेर लहारे)**
प्र.नगरसचिव
अहमदनगर महानगरपालिका,

सही/-
**(यशवंत डांगे)**
मा.प्रशासक,
अहमदनगर महानगरपालिका,